# SCHOLARS IMPACT

Quarterly

An International Multidisciplinary Multilingual Peer Reviewed Research Journal

ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640

Special Issue

Approved By UGC Journal No- 41129

IMPACT FACTOR - 5.98


UGC (CPE) Sponsored
One Day Interdisciplinary National Level Conference
on

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM : CHALLENGES AND OPPORTUNITIES"

16th February 2019

स्थापना १९६१
म.शि.प्र. मंडळाचे
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी


**Volume-II, February 2019 (Special Issue)**


ज्ञान-विज्ञान विमुक्तये
University Grants Commission


✤ EDITOR IN CHIEF ✤

DR. M. RAGHIB DESHMUKH

✤ GUEST EDITOR ✤

DR. BALASAHEB JADHAV


www.scholarsimpact.com

: Organised by :

Department of Political Science
M.S.P. Mandal's
SHRI SHIVAJI COLLEGE, PARBHANI.

UGC - College with Potential for Excellence NAAC Accrediated A+Grade (Third Cycle)
(Affiliated to : Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

| | | |
|---|---|---|
| 41. | ब्रिटीश राजवटीतील स्त्रियांच्या मानवी हक्क संरक्षणाचे कायदे<br>प्रा. यादव परमेश्वर दत्tाराव | 143 –147 |
| 42. | लोकशाही समोरील आव्हाने<br>प्रा. डॉ. अंभुरे एस. डी. | 148 –150 |
| 43. | भारतीय लोकशाही आणि मानवी हक्क<br>प्रा. डॉ. बी. एम. नरवाडे | 151 –154 |
| 44. | भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>बावचकर ऋतूजा पांडूरंग | 155 –158 |
| 45. | भारतीय लोकशाही आणि महिला सहभाग व संघटना<br>डॉ. सटाले एस.एन. | 159 –161 |
| 46. | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br>डॉ. एस.एन. आकुलवार | 162 –163 |
| 47. | भारतीय लोकशाही व दहशतवाद<br>डॉ. किरण चक्रे | 164 –169 |
| 48. | भारतीय लोकशाही व धर्माचे राजकारण<br>श्रीमती स्वाती बोकारे | 170 –171 |
| 49. | भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा. डॉ. तुकाराम एकनाथराव बोकारे | 172 –175 |
| 50. | महाराष्ट्र विधिमंडळ महिला सहभाग<br>प्रा. डॉ. आंधळे बी. व्ही. | 176 –179 |

(44)

# भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग

बावचकर ऋतूजा पांडूरंग
एम.ए. द्वितीय वर्श
राज्यशास्त्र विभाग
राजर्शी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

प्रस्तावना :

प्रत्येक व्यक्तीला आपल्या व्यक्तीमत्त्वाचा विकास घडवून आणने महत्त्वाचे वाटते त्यासाठी व्यक्तीस्वातंत्र्याची आवश्यकता असते. व्यक्तीस्वातंत्र्य हे लोकशाहीचे एक मूलतत्व आहे. व्यक्तीमत्व विकासाकरीता जितके पोषक वातावरण लोकशाही व्यवस्थेत आढळून येते तितकेच धर्मवादी, हुकुमशाही किंवा लष्करशाही व्यवस्थेत आढळून येत नाही. त्यामुळेच विसाव्या शतकाच्या शेवटी संपूर्ण जगभर लोकशाहीचा प्रसार झाला आणि नवीन विश्वरचनेत लोकशाहीची जाणीव वैश्वीक बनल्यामुळे अनेक राष्ट्रांनी त्यांच्या पूर्वीच्या शासन प्रणालीचा त्याग करून लोकशाहीचा स्वीकार केला आहे.

लोकशाही शासनव्यवस्थेत समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय इ. मूलतत्वे अंत्तर्भूत असतात. अंतर्भूत व्यक्तीचा सर्वांगिन विकास होऊन तीची प्रतिष्ठा जोपासण्याची हमी लोकशाहीत असते. त्यामुळेच स्वातत्र्य प्राप्तीनंतर भारताने लोकशाही शासन व्यवस्थेचा स्विकार केला. लोकशाही शासनव्यवस्थेत लोकसहभाग अत्यंत महत्वाचा असतो कारण लोकसहभागामुळे राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन लोकशाही व्यवस्थेला बळकटी येते. मात्र लोकशाही व्यवस्थेचा विकास होत असताना देशातील एकूण लोकसंख्येपैकी अर्धी लोकसंख्या असलेला महिला वर्ग राजकीय सत्तेच्या सहभागापासून वंचित राहत असेल तर ख–या अर्थाने लोकशाही शासनव्यवस्था फलद्रूप होणार नाही.

त्या अनुशंगाने प्रस्तूत लेखात भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभागाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे

उद्दिष्टे :

1) महिलांचा राजकीय सहभाग वाढविणे.
2) महिलामध्ये राजकीय जागृती निर्माण करणे.
3) महिलांचा सर्वांगिण विकास साध्य करणे.

गृहितके :

1) लोकसभा व महाराष्ट्र विधानसभेतील महिलांचा राजकीय सहभाग हा अल्प आहे.
2) 73 व्या व 110 व्या घटनादुरूस्तीमुळे महिलांच्या राजकीय सत्तेतील सहभागात वाढ झाली आहे.
3) स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला आरक्षणाच्या तरतुदीमुळे महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे.

भारतीय राजकारणातील महिलांचा सहभाग :

भारतातील प्राचीन समाजव्यवस्थेतील रूढी परंपरामुळे स्त्रियांना नेहमी दुय्यम स्थान देण्यात आले. त्यामुळे तिच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि सांस्कृतीक विकासावर मर्यादा पडल्या. राजकीय निर्णय प्रक्रियेतील तिचा सहभाग नाकारून तिचे विश्व चार भिंतीत बंदिस्त केले गेले. मात्र स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्वतंत्र भारतासाठी राज्यघटनेची निर्मिती करीत असताना भारतीय संविधानाच्या शिल्पकारांनी महिलांची स्थिती सुधारण्याची प्रतिज्ञा केली होती. त्यानुसार भारतीय राज्यघटनेमध्ये महिलांनाही पुरूषांच्या बरोबरीने समान राजकीय अधिकारांची तरतुद करण्यात आली. भारती संविधानातील कलम 14 – सर्व नागरीक कायद्यापुढे समान असतात., कलम 15 नुसार धर्म,

वंश, जात, लिंग यावरून कोणत्याही प्रकारचा भेदभाव करता येत नाही., कलम 16 नुसार शासकीय सेवेत सर्वांना समान संधी इ. असेल.

घटनात्मक तरतूदीमुळे महिला वर्गामध्ये राजकीय जनजागृती झाली. भारतीय राज्यघटनेत महिलांना समान राजकीय अधिकार देण्यात आले. तसेच अनेक समाजसुधारकांनी त्यांचा सामाजिक व राजकीय दर्जा वाढावा म्हणून मोठ्या प्रमाणात प्रयत्नही केला. असे असले तरीही महिलांचा राजकीय सत्तेतील सहभाग म्हणावा तसा वाढलेला नाही. केंद्रस्तरावर व राज्यस्तरावर महिलांचा राजकीय सत्तेतला सहभाग हा अत्याल्प असल्याचे दिसते. त्याचा आढावा खालील तक्त्यात घेण्यात आला आहे.

महिलांच्या राजकीय सहभागाची सद्यस्थिती :

लोकसभा :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतातील राष्ट्रीय स्तरावरील राजकारणात महिलांच्या राजकीय सहभागाची सद्यस्थिती कशी आहे त्याची आकडेवारी पुढील तक्त्यामध्ये मांडली आहे.

| लोकसभा वर्श | जगा | महिला सदस्य |
|---|---|---|
| 1952 | 499 | 22 |
| 1957 | 500 | 27 |
| 1962 | 503 | 34 |
| 1967 | 523 | 31 |
| 1971 | 544 | 22 |
| 1977 | 521 | 19 |
| 1980 | 544 | 28 |
| 1984 | 544 | 44 |
| 1989 | 517 | 27 |
| 1991 | 544 | 39 |
| 1996 | 543 | 39 |
| 1998 | 543 | 43 |
| 1999 | 513 | 49 |
| 2004 | 545 | 45 |
| 2009 | 543 | 59 |
| 2012 | 543 | 65 |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशात लोकसभेसाठी 1952 ते 2012 पर्यंत झालेल्या निवडणूकीत महिलांचा राजकारणातील सहभाग वाढला आहे. 1952 साली महिला सदस्यांची संख्या केवळ 22 होती ती 2014 मध्ये 65 इतकी झाली असली तरी एकूण लोकसभेतील पुरुष सदस्य संख्येच्या तुलनेत ती अत्याल्प असल्याची दिसून येते.

महाराष्ट्र विधानसभा :

महाराष्ट्रातील विधानसभेत महिलांच्या प्रतिनिधीत्वाची टक्केवारी खालील तक्त्यात दर्शविली आहे–

| अ.क. | विधानसभा निवडणूक वर्श | सभासद संख्या |
|---|---|---|
| 1 | 1962 | 6.4% |
| 2 | 1967 | 4.4% |
| 3 | 1972 | 10.3% |
| 4 | 1978 | 3.10% |
| 5 | 1980 | 9% |
| 6 | 1985 | 5.5% |

| | | |
|---|---|---|
| 7 | 1990 | 5.5% |
| 8 | 1995 | 2.7% |
| 9 | 1999 | 3.8% |
| 10 | 2004 | 3.8% |
| 11 | 2009 | 3% |
| 12 | 2014 | 3% |

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूकीचा 2014 पर्यंतचा आढावा घेतल्यास असे निदर्शनास आले की, 1990 पासून प्रत्येक निवडणूकीत महिलासदस्य संख्येत घट होत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांच्या राजकीय सहभागाची स्थिती :

लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी भारताने सत्तेच्या विकेंद्रीकरणावर भर दिला. सत्ता ही एका व्यक्तीच्या हातात केंद्रीत नसून, तीचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मिळावा याच उद्देशाने सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे तत्व स्विकारले. भारतात सत्तेचे विकेंद्रीकरण केंद्र, राज्य व स्थानिक पातळीवर करण्यात आले. स्थानिक पातळीवरही महिलांचा सहभाग वाढावा या उद्देशाने 1993 साली 73 वी व 74 वी घटनादुरूस्ती करून शासनाने महिलांना स्थानिक शासन संस्थामध्ये 33 टक्के आरक्षणाची तरतूद केली.

स्थानिक शासनातील आरक्षणाच्या तरतुदीमुळे वर्षानुवर्षे चार भिंतीच्या आत अडकून पडलेली स्त्री आज तिचे पाऊल उंबरठ्याच्या बाहेर पडलेले दिसून येते. स्थानिक शासनात महिलांचा सहभाग हा वाढू लागला. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीच्या अनुक्रमे अध्यक्ष, सभापती आणि सरपंचाची पदे भूषवित. परंतू 73 व्या घटनादुरूस्तीने महिलांना दिले गेलेले आरक्षण हे महिलांच्या लोकसंख्येच्या तूलनेत अपर्याप्त वाटू लागले. त्यामुळे त्यात वाढ करण्यासाठी भारत सरकारने 110 वी घटनादुरूस्ती करून महिलांना स्थानिक शासनात 50 टक्के राजकीय आरक्षण लागू केले. या तरतुदीमूळे स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांचा राजकीय सहभाग हा वाढला आहे. सद्यस्थितीत महिलांचा स्थानिक शासनातील सहभाग पुढील तक्त्याच्या आधारे दिसून येते.

| अ.क. | संस्था | संख्या | महिला सदस्य |
|---|---|---|---|
| 1 | जिल्हा परिशद | 33 | 978 |
| 2 | पंचायत समिती | 351 | 1955 |
| 3 | ग्रामपंचायत | 27896 | 98669 |

महिलांचे राजकीय सहभाग वाढीचे उपाय :

लोकसभा, राज्यसभा व स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांच्या राजकीय सहभागाचा आढावा घेतला तर असे निदर्शनास येते की, केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांचा राजकीय सहभाग वाढला. मात्र निर्णय प्रकियेतील काही महिलांचा सहभाग बोटावर मोजण्या इतक्याच दिसून येतो. म्हणजे महिलांचे राजकीय सबलीकरण झाले का? असा प्रश्न उपस्थित होतो. आजही सरपंच झालेली स्त्री फक्त झेंडा फडकविण्यासाठी ग्रामपंचायतीमध्ये येते. प्रत्यक्षात त्या पदाचा कारभार तीचा पतीच पाहतो. लोकसभेचा विचार केला तर आजही लोकसभेत महिलांना आरक्षण दिले गेलेले नाही. याचे कारण पुरूषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व आणि प्राचीन काळापासून रूढी–परंपरेने स्त्रीयांना दिले गेलेले दुय्यम स्थान आहे. त्यामुळे निर्णय प्रकियेतील महिलांचा सहभाग सकिय व्हावा व त्याचबरोबर नाममात्र नेतृत्वाच्या ठिकाणी वास्तव व सक्षम नेतृत्व पुढे यावे यासाठी काही उपाययोजना करणे आवश्यक आहे.

1) महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी तसेच त्यांना राजकीय दृष्ट्या सक्षम करण्यासाठी पंचायतराज संस्थेत असलेल्या राजकीय आरक्षणाप्रमाणे ते विधानसभा व लोकसभेसाठी लागू करण्यात यावे.
2) पंचायतराज संस्थेच्या तीन्ही स्तरावरील राजकारणात उत्कृष्ट कार्य करणा–या महिला प्रतिनिधी व पदाधिकारी यांना पुरस्कार देऊन सन्मान करण्यात यावा. यामुळे त्यांना अधिक प्रभावी व जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा मिळेल.
3) महिलांमध्ये राजकीय जनजागृती करण्यासाठी शासनाने विविध कार्यकमाचे आयोजन करावे. जेणेकरून महिलांचा आत्मविश्वास वाढेल.

4) राजकीय क्षेत्रातील जबाबदारी पार पाडत असताना महिलांना सुरक्षीततेची भावना निर्माण झाली पाहिजे त्यासाठी विविध उपाययोजना करण्यात याव्या.

संदर्भ :

1) डॉ. भास्कर भोळे – राजकीय सिंध्दात
2) डॉ. अजय पाटील – पंचायतराज आणि महिला नेतृत्व, मैत्री प्रकाशन, लातूर.
3) गोटे शुभांगी – स्त्री परिवर्तनाची आव्हाने साऊथ एशियन सोशल रिसर्च पब्लिकेशन, औरंगाबाद.
4) लोकराज्य – मार्च 2010.
5) लोकराज्य – एप्रिल 2012.